प्रति

संपादक / वृत्तसंपादक

कृपया, प्रसिध्दीकरिता सादर


# PRESS NOTE

THE BRIHAN MUMBAI
ELECTRIC SUPPLY &
TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

प्रसिद्धी पत्रक

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा
आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

(मनोज वराडे)
उप जनता संपर्क अधिकारी
दूरध्वनी क्र.२२७९९३९६


---

प्रसिध्दी पत्रक क्र. ११

दिनांक : २३.०९.२०१९

## <u>रिडलर ॲपच्या सहाय्याने मोबाईलद्वारे बस तिकीट आणि बसपासची खरेदी</u>

मुंबई, २३ - बेस्ट उपक्रमाद्वारे नेहमीच प्रवाशांच्या सोयीचा विचार केला जातो. अलीकडेच बसगाडयांचे सुसूत्रीकरण करण्यात आले असून बस भाडे कमी झाल्यामुळे प्रवाशांना दैनंदिन प्रवासामध्ये सुट्टया पैशांची समस्या भेडसावत असल्याचे निदर्शनास आले आहे.

त्यामुळे प्रवासी आणि बस वाहक यांच्यामध्ये दररोज वादावादीचे आणि तणावाचे प्रसंग निर्माण होत असल्याचे आढळत आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी कार्यरत असलेले रिडलर ॲप अधिकाधिक प्रवाशांनी वापरावे अशी त्यांना बेस्ट उपक्रमाद्वारे विनंती करण्यात येत आहे.

रिडलर ॲपच्या सहाय्याने मोबाईलद्वारे प्रवासी खालील सोयींचा लाभ घेऊ शकतात -

- बसची तिकीटे मोबाईलद्वारे खरेदी करु शकतात
- त्याचप्रमाणे याच ॲपद्वारे मासिक, त्रैमासिक, बसपासचे नूतनीकरणदेखील करु शकतात
- ई वॉलेटचा उपयोग करुन मोबाईल बसपासचे नूतनीकरण करु शकतात

बेस्ट उपक्रमाद्वारे सर्व प्रवाशांना असे आवाहन करण्यात येते की, त्यांनी बस प्रवास सोयीस्कर होण्यासाठी आणि सुट्टया पैशांची समस्या सोडविण्यासाठी कृपया रिडलर ॲपचा वापर करावा.

.......